## कमला महाविद्यालयात शिक्षक-पालक मेळावा

कोल्हापूर, ता. १८ : येथील कमला महाविद्यालयात शिक्षक-पालक संघाचा मेळावा झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य क्रांतिकुमार पाटील होते.

या वेळी प्राचार्य पाटील म्हणाले, "उच्च शिक्षण प्रक्रियेत बदल होत आहे. नवीन आव्हाने उभी राहत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व्यवसायाभिमुख ज्ञान देणे आवश्यक आहे." याप्रसंगी पालकांच्या वतीने बलभीम आळवेकर यांनी व शिक्षकांतर्फे प्रा. रेखा पंडित यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रा. ए. एम. साळोखे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. बी. व्ही. शेळके यांनी प्रास्ताविक केले. प्रा. टी. एस. थोरात यांनी आभार मानले.

## कमला महाविद्यालयात शिक्षक-पालक संघाचा मेळावा

कोल्हापूर, दि. १६ (प्रतिनिधी) : ताराराणी विद्यापीठाच्या 'कमला महाविद्यालयात शिक्षक-पालक संघाचा मेळावा झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ताराराणी विद्यापीठाचे सचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील होते.

प्राचार्य पाटील म्हणाले, उच्चशिक्षण प्रक्रियेत अमूलाग्र बदल होत आहेत. नवीन आव्हाने उभी राहत आहेत. परदेशी विद्यापीठे येत आहेत. त्यामुळे आपण विद्यार्थ्यांच्या विकासाचा विचार करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व्यवसायाभिमुख ज्ञान देण्यासाठी तयार राहणे गरजेचे आहे. पालकांनी आपल्या पाल्याच्या विकासासाठी सातत्याने व जाणीवपूर्वक लक्ष देऊन पालकत्वाची जबाबदारी सक्षमतेने पार पाडली पाहिजे. पालकांच्यावतीने बलभीम आळवेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्रा. जे. बी. पाटील यांनी 'नॅक' विषयाची माहिती दिली. शिक्षकांतर्फे प्रा. रेखा पंडित यांनी मनोगत व्यक्त केले.

फेब्रुवारी / लोकमत